# प्रेसनोट

दि. ०१/०९/२०२३

**पुणे येथील शिवाजीनगर दिवाणी न्यायालयामधील बेलिफ वर लाच मागणी व लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७, १२. |
| तक्रारदार | महिला, वय - २९ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | लक्ष्मण नथू काळे, वय ४० वर्षे, पद - बेलिफ (वर्ग - ३), दिवाणी न्यायालय, शिवाजीनगर, पुणे व अन्य एक. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १,०००/- रुपये (एक हजार रुपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १,०००/- रुपये (एक हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | ०१/०९/२०२३ |
| सापळा दिनांक | ०१/०९/२०२३ |

ठिकाण :- शिवाजीनगर कोर्ट गेट नं. ४ चे समोरील मसाला चहाचे दुकानाजवळ, शिवाजीनगर, पुणे

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी शिवाजीनगर दिवाणी न्यायालय, पुणे येथे जमिनीचे संदर्भात दावा दाखल केलेला आहे. त्यामधील प्रतिवादी यांना कोर्टात हजर राहणेसंबंधी समन्स बजाविणेचे काम लोकसेवक लक्ष्मण काळे, बेलिफ करीत होते. सदरचे समन्स वेळेत बजावून त्याचा रिपोर्ट न्यायालयात देणेसाठी लोकसेवक लक्ष्मण काळे यांनी १०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

तक्रारदारांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी केली असता, लोकसेवक लक्ष्मण काळे यांनी तक्रारदार यांचेकडे सदरचे समन्स बजावणीकरुन न्यायालयात रिपोर्ट देणेकरीता १,०००/- रुपयांची पंचासमक्ष लाच मागणी करुन, १,०००/- रुपये (एक हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. तसेच लोकसेवक काळे यास तक्रारदाराकडून लाच रक्कम घेणेसाठी अन्य लोकसेवक यांनी प्रोत्साहन दिले वरून शिवाजीनगर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याचे काम सुरु आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस उपअधीक्षक माधुरी भोसले तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.